*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org,  9226563052*

# Unit 4

# Medieval Philosophy

## मध्ययुगीन तत्त्वज्ञान

1 : ग्रीकांचा आणि ख्रिश्चनांचा जगाविषयीचा दृष्टिकोन, विश्वास आणि श्रध्दा,
संत ऑगस्टीन : ईश्वराचे स्वरुप, आत्मा आणि जग.

2 : संत ॲन्सेल्म : ईश्वराच्या अस्तित्वाचा सत्तामीमांसाशास्त्रीय युक्तिवाद.
संत ॲक्विनास : ॲरिस्टॉटलचा आणि ख्रिश्चनांचा जगाविषयीचा दृष्टिकोनाचा समन्वय,
ईश्वराच्या  अस्तित्वाचे युक्तिवाद.

3 : अबेलॉर्ड आणि ओख्यॅम : सामान्यविषयक सिध्दान्त : संकल्पनावाद आणि नाममात्रवाद.



---

## मध्ययुगीन तत्त्वज्ञान

### ग्रीकांचा आणि ख्रिश्चनांचा जगाविषयीचा दृष्टिकोन, विश्वास आणि श्रध्दा

### मध्ययुग (The Middle Ages 1476-1453)

**प्रस्तावना :**

साधारपणपणे रोमचा पाडाव झाल्यानंतर इ.स. 476 पासून इ.स. 1453 पर्यंतचा सुमारे 1000 वर्षाचा कालखंड म्हणजे मध्ययुग[1] होय.हेलेनिक[2] रोमन कालखंड आणि मध्ययुगीन कालखंड मिळून सुमारे 1800 वर्षाचा कालावधी होतो.या कालात कोणतेही महत्वाचे नवे तत्वज्ञान,नवे विचार, नवी रचना काहीच निर्माण झाले नाही.

अर्थात हेलेनिक काल व मध्ययुगीन काल यांच्या दृष्टीकोनात महत्वाचा फरक होता.हेलेनिक विचार स्वातंत्र्य या संकल्पनेच्या वास्तवातील अमलबजावणीने सुरु झाला आणि त्याची परिणती स्वातंत्र्याची नवी परंपरा निर्माण होण्यात झाली.उलट मध्ययुगीन विचाराची सुरुवात (आधीच अस्तित्वात असलेल्या तसेच रूढी बनलेल्या )परंपरेत झाली आणि स्वातंत्र्याच्या दिशेने वृध्दिगंत झाली. मध्ययुगीन माणूस त्याच्या आधीच्या पिढीकडून मिळालेल्या धर्मावर संतुष्ट नव्हता.त्याने शुध्द ज्ञानाची उपासना आरंभिली.  ज्या समस्यांच्या त्यांनी विचार केला त्या समस्य प्राचीन कालातीलच होत्या. अर्वाचीन विचारांची काही बीजे मध्ययुगीन विचारांतही सापडतात पण ते विचार त्या काळातील शिष्यांचे होते, गुरुंचे नव्हते.

कुशमन[3] या इतिहासकाराच्या मते प्राचीन विचारवंतांनी ग्रीक, रोमन व ख्रिश्चन धर्म यांच्या तीन संस्कृतीना एकत्र आणले होते. हेलेनिझम (Hellinism) या संज्ञेने ओळखली जाणारी बुध्दिप्रधान ग्रीक संस्कृती ही प्राधान्याने राजकीय स्वरुपाच्या रोमन संस्कृतीवर लादली गेली होती.आणि या दोन्ही भिन्न स्वरुपी पध्दतीवर

Document of Philosophy, Sangamner College Sangamner

---

[1] "Middle Ages" (*medium aevum*) ही संकल्पना  Leonardo Bruni  (( 1370 – March 9, 1444) इतिहासकाराने त्याच्या *History of the Florentine People* (1442) ही या ग्रंथात मांडली.हा प्रबोधनकालीन कवी व इतिहासकार होता.त्याला **'पहिला आधुनिक  इतिहासकार '** म्हंटले जाते.

[2]'हेलेनिक' ही संज्ञा  जोहान गुस्ताव ड्रायसेन ( जुलै 6, 1808  ते जून 19, 1884) या जर्मन इतिहासकाराने **ग्रीक** या शब्दाला समांतर म्हणून दिली.चौथ्या शतकात ॲलेक्झांडर दी ग्रेटने जिंकलेला सारा प्रदेश या नावाने ओळखला जात होता. या नव्या प्रदेशातील लोकांपासून मूळ जेते ग्रीक वेगळे दिसावेत, यासाठी ही संज्ञा वापरली जात होती.ग्रीस भाषेचा समावेश असलेल्या प्राचीन इंडो-युरोपीयन भाषासमूहासाठी 'हेलेनिक' ही संज्ञा  वापरली जाते.

[3] Arthur Cushman McGiffert (March 4, 1861 - 1933) अमेरिकन धर्मशास्त्रवेत्ता

नियंत्रण चालवणारा असा ख्रिश्चन धर्म संघटित स्वरुपात उदयास आला होता.तथापि मध्ययुगाच्या पहिल्या तीन शतकांत अशा त-हेच्या वेगळ्या दर्जाच्या संस्कृतीवर हल्ल्यांवर रानटी जर्मनांनी हल्ले चढवून जेते या नात्याने प्रवेश केला होता.

हल्लेखोर व आक्रमक जर्मनांनी तत्कालीन समाजात संस्कृतीला लागलेली तत्वज्ञान व कला यांची कोमल फुले कुस्करुन टाकली. जर्मन हे शूर, सामर्थ्यसंपन्न व तरुण लोक होते.त्यांनी जेते म्हणून या समाजात प्रवेश करुन त्याच्या मर्यादा तोडून टाकल्या होत्या.पण त्यांचे गुणग्रहण करण्याइतका त्यांचा मानसिक व बौध्दिक विकास झालेला नव्हता.साहजिकच त्या वेळच्या लोकांचे तत्वज्ञान, कला किंवा राजकीय प्रणाली यांना जेते जर्मन जिंकू शकले नाहीत. त्यांच्यावर परिणाम झाला तो फक्त धर्माचा व चर्चचा. ख्रिश्चन चर्चने जे आध्यात्मिक सामर्थ्य मिळविले होते त्याने जर्मन प्रभावित झाले. जर्मनांचे वैयक्तिक आंतरिक जीवन चर्चने व्यक्त केले, म्हणून ते चर्चचे पुरस्कर्ते बनले आणि या रीतीने प्राचीन संस्कृतीचे संरक्षक बनले. पश्चिम युरोपातील मध्ययुगीन इतिहास हा ख्रिश्चन चर्चच्या प्रभावाखाली जर्मनांच्या झालेल्या विकासाचा माहितीपट आहे.

## तमोयुग (Dark Age 476 - 800)

मध्ययुगास ***'तमोयुग' (Dark Age)***[4] म्हणण्याची पध्दत आहे.कारण या कालात काहीच नवे ज्ञान निर्माण झाले नाही, असा समज आहे.मध्युगाची पहिली तीन शतके तरी काहीच घडले नव्हते.ज्याला तमोयुग म्हणता येईल, तो कालखंड जुन्या रोमन साम्राज्याचा पाडाव झाल्यापासून इ.स. 476 पासून ते शार्लमेन (Charlemagne)[5] या सम्राटाचे साम्राज्य प्रस्थापित होण्यापर्यंतच्या कालखंडाचा सुमारे 300 वर्षांचा आहे.पण याही कालात इटलीत स्वतंत्र बुध्दीने काम करणारे काहीजण होते.या कालात ऑगस्टीन आणि एरिजेना हे दोन तत्त्वज्ञ होवून गेले. तथापि त्यांच्यातील चारशे वर्षांच्या कालखंडात काहीच **नवे** ज्ञान रचले गेले नाही, त्यामुळेही या कालखंडास तमोयुग म्हणतात.

### मध्ययुगाची कालविभागणी

कुशमन मध्ययुगाची खालील तीन कालखंडांत विभागणी करतो.

(1) प्रारंभीचा कालखंड --- इ. स. 476 ते 1000
(2) संक्रमणाचा कालखंड --- इ. स. 1000 ते 1200
(3) अभिजात स्कोलॅस्टिकवाद (पांडित्यवाद Classical Scholasticism)--- इ. स. 1200 ते 1450

## मध्ययुगीन प्रारंभीचा कालखंड (इ. स. 476 ते 1000)

हा पाचशे वर्षांचा कालखंड प्रामुख्याने आध्यात्मिक स्वरुपाचा होता हा केवळ योगायोग म्हणता येणार नाही. त्याला त्या काळच्या राजकीय घडामोडी व हेलेनिक-रोमन कालापासून लोकांना लाभलेला बौध्दिक वारसा ही दोन्ही कारणीभूत होती. रोमन साम्राज्याला लागलेल्या अवनतीच्या काळात लोकांना जे त्रास व हाल सोसावे लागले त्यामुळे त्यांना या जगाविषयी आस्था वाटेनाशी झाली होती. मोठमोठ्या राज्यांनी व भौतिक समृध्दीने युक्त असे जग तत्कालीन लोकांना आदर्शवत वाटेनासे झाले होते.

---

[4]dark age : Latin *saeculum obscurum* ही संज्ञा पेट्रार्क Francesco Petrarca (July 20, 1304 – July 19, 1374) या इटालियन मानवतावादी अभ्यासकाने 1330 मध्ये दिली. तो इतिहासकार व कवी होता.
[5]Charlemagne (English: Charles the Great) 02 एप्रिल 742 ते 28 जानेवारी 814.रोमन साम्राज्याचा भाग असलेल्या संपूर्ण पाश्चात्य युरोपचा सम्राट. तो. फ्रॅन्कचा राजा होता. मध्य युरोप व पाश्चात्य युरोपपर्यंत साम्राज्य विस्तारून तो सम्राट झाला.



Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

ऑगस्टीनच्या मार्फत चर्चने जर लोकांसमोर स्वर्गीय आदर्श उभा केला नसता,त्याला आदर्शाकडे पोहोचवण्याचा मार्ग दाखविला नसता तर ते युग निराशेच्या खोल गर्तेत घसरुन पडले असते. माणसापासून भौतिक विश्वाने बरेच काही हिरावून नेले होते. त्याचवेळी आध्यात्माने माणसांना जे देऊ केले होते त्यातील  ईश्वराचे स्वरुप, देवदेवतांची संख्या,त्यांचा दर्जा, कर्मकांड व आत्म्याची मुक्ती यांचा विचार करण्यातच गढून गेलेले होते.

9th-century depiction of Charlemagne with popes Gelasius I and Gregory the Great



या काळात प्लेटो व ॲरिस्टॉटलच्या तत्वज्ञानाविषयी लोकांना अज्ञानच होते. धर्मगुरु , त्यांचे मठ हे महत्वाचे सामाजिक संघटक बनले.त्यांना सामाजिक सामर्थ्य प्राप्त झाले. संघटित संन्यस्त जीवनात स्वर्गाच्या विचारांना स्थान मिळायला लागले. विचारापेक्षा प्रार्थना बलवत्तर ठरली, श्रध्देने ज्ञानाला दुय्यमत्व दिले.  नवप्लेटोवादी आदर्शवादाने बुध्दिवादी जगावर प्रभुत्व प्रस्थापित केले आणि लोकांच्या मनात ईश्वरी कृपेच्या विचाराने प्रमुख स्थान पटकावले. या काळाच्या सुरुवातीस ऑगस्टीन[6] उदयास आला, त्याने काळाला  पाहिजे असलेल्या ईश्वरी कृपेच्या संकल्पनेला व्यवस्थित रुप दिले.या युगाच्या शेवटी एरिजेना[7] आला आणि त्याने नवप्लेटोवाद हा अतिरेकी स्वरुपात मांडला.

## खिश्चन धर्म (Christianity)

खिश्चन धर्म हा ईश्वराने प्रकटित केलेला धर्म म्हणून अवतीर्ण झाला. मोक्षप्राप्तीचा व प्रेमाचा सिध्दांन्त म्हणून खिस्ताने हा धर्म जगास दिला, असा खिस्तीजनांचा विश्वास आहे. हा धर्म एखाद्या सिध्दान्ताच्या अमूर्त स्वरुपात पृथ्वीवर आला नाही आणि खिस्ताने आपले दूत प्राध्यापकांची आसने विभूषित करण्यासाठी पाठविले नाहीत! खिश्चन धर्म हा प्रत्यक्ष जीवन जगण्याचा एक मार्ग (way) होता.ईश्वराप्रत जाऊन पोहोचण्यासाठी आक्रमावयाचा एक पंथ म्हणून सर्वसामान्य लोकांना देण्यात आलेला होता.

## खिश्चन धर्माची देणगी

मध्युगात खिश्चन धर्माचे खिश्चन ईश्वरशास्त्रामध्ये  रुपांतर होण्याच्या प्रक्रिया झाली.पण या प्रक्रियेत ईश्वराच्या विचारापेक्षा त्याचे प्रेम, साधुता व करुणा यांवर अधिक भर देण्यात आला.  समाजातील श्रेष्ठ -कनिष्ठ वर्गीय भावनांचा लोप करुन काही थोडया अभिरुचिसंपन्न, सुसंस्कृत व गुणवान माणसांना महत्व देण्यापेक्षा सर्व जनांच्या बंधुभावनेवर अधिक भर देण्यात आला.  म्हणजे माणसाचे मूल्य व त्याचा दर्जा त्याच्या बाह्य लक्षणावरुण मुक्त किंवा बंधनांकित, शास्ता व शासित यासारख्या सामाजिक स्वरुपावरुन न ठरविता प्रत्येक व्यक्तीचे मूल्यमापण तिच्या अंतरंगावरुन (lanner Kingdom) ठरविण्यात येऊ लागले. *''सर्व आत्मे समान असतात''* असे गृहीततत्त्व त्यामागे होते.

[6] November 13, 354 – August 28, 430
[7] Johannes Scotus Eriugena/ Erigena 815 –  877, आयरिश धर्मतत्त्वज्ञ

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

या पूर्वीच्या काळात व्यक्तीचा जन्म ज्या उच्चनीच कुळात झालेला असते व त्याची विद्योपासना ज्या प्रकारची असते व तिचे सामाजिक स्थान ज्या प्रमाणात श्रेष्ठ-कनिष्ठ किंवा सामान्य स्वरुपाचे असे त्यावरुन तसे मूल्यमापन करण्यात येई. तिचा दर्जा व प्रतिष्ठा त्यावरुन मोजण्यात येई. हे सर्व निकष एका अर्थाने बाह्य स्वरुपाचे व कृत्रिम होते. पण स्वरुपत: *सर्व व्यक्तीचे आत्मे समान* असे मानल्याने व्यक्तीचे मूल्यमापन करताना तिच्या बाह्य व सामाजिक रुपावरुन न करता तिचे आंतरिक, मानसिक, व आत्मिक व्यक्तित्व लक्षात घेवूनच करावे, तेच व्यक्तीच्या मूल्याचे व प्रतिष्ठेचे गमक समजावयास पाहिजे, असा महान विचार या काळात ख्रिश्चन धर्माने पुरस्कारिला.

यामुळे आतापर्यत तुच्छ समजण्यात येत असलेली सामान्य कुलशीलाची, गरीब, अशिक्षित,साधीभोळी माणसे आदरणीय समजण्यास येऊ लागली.'' *सर्व माणसे एकाच ईश्वराची लेकरे* '' असल्याने प्रत्येक व्यक्तीस आपल्या पित्याकडे (Father) म्हणजे ईश्वराकडे जाण्याचा पूर्ण हक्क असे मानले गेले.ख्रिश्चन धर्माने ईश्वराकडे जाण्याच्या मार्गातील सर्व कृत्रिम अडथळे व निर्बंध दूर करुन सर्वसामान्य मानवाची प्रतिष्ठा उंचावली. त्याची कामगिरी फार मोलाची आहे.

## संत ऑगस्टीन

## ईश्वराचे स्वरुप, आत्मा आणि जग.

सेंट ऑगस्टीन याचे मूळचे नाव Aurelius Augustinus असे असून तो ***'ख्रिश्चन धर्माचा प्लेटो'*** या नावाने ओळखला जातो.त्याचा जन्म उत्तर आफ्रिकेतील टागास्ते, नुमिडिया (Tagaste, Numidia) येथे झाला. त्याचा पिता पॅट्रिसिअस (Patricius) हा पॅगन[8] होता व त्याची माता मोनिका (Monica) ही ख्रिश्चन होती. ऑगस्टीनच्या चारित्र्य घडणीवर मातेचा खूपच मोठा प्रभाव होता. त्याचे शिक्षण मदोरा (madoaura) आणि कार्थेज येथील विद्यालयात झाले होते. त्याच्या विद्यार्थिदशेत तो चैनबाजीकडे झुकला होता. त्याच्या त्या वेळच्या जीवनाचे वर्णन त्याने आपल्या ***'कन्फेशन्स' (confessions)*** या आत्मचरित्रवजा ग्रंथात केले आहे.

त्यावेळच्या सर्व वैज्ञानिक व धार्मिक प्रश्नांवर त्याने विचार केला होता. आशिया मायनर आणि इटलीत अनेक ठिकाणी त्याने भाषालंकार शास्त्राचे अध्यापन केले होते. मात्र नंतर त्याने ईश्वरशास्त्राचा (Theology) अभ्यास सुरु केला.विविध धार्मिक शंकांनी त्याचे मन उद्विग्न झाले होते व प्रथम त्याने मॅनिकिझममध्ये (Manichaeism)[9] समाधान लाभते की काय हे शोधण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर तो अकादमीच्या संशयवादाकडे वळला व नंतर त्याने नवप्लेटोवादाचा आश्रय घेतला.ऑगस्टीनच्या मनावर व विचारावर प्लेटोच्या विचारांचा व विशेषत: नीतिविषयक विचारांचा प्रगाढ परिणाम झालेला होता.त्याने प्लेटोनसच्या नवप्लेटोवादाचा काळजीपूर्वक अभ्यास केला होता. त्याने प्लेटोच्या केलेल्या अभ्यासाने, सेंट ॲम्ब्रोजच्या वक्तृत्वाने,आईमुळे त्याने ख्रिश्चन धर्माची दीक्षा घेतली.तो आधी पुजारी व मग बिशप बनला. त्याने चर्चच्या व्यावहारिक संघटनेत व धर्मतत्वांची रचना करण्यात अविश्रांत श्रम केले. मृत्यूपर्यंत कॅथॉलिक संप्रदायाचा प्रसार केला. प्लेटोच्या आदर्शवादाचा त्याच्यावर जबरदस्त परिणाम झाल्याने **city of god** या नावाचा तत्वज्ञानाचा त्याने इतिहास लिहिला.त्यात त्याने ***ईश्वराचे गाव पृथ्वीवर नसून स्वर्गात असते*** असे म्हटले आहे.

---

[8]*Paganism* (from Latin *paganus*, meaning "country dweller", "rustic) अर्थ : ग्रामीण भागातील अनेक देवतापूजक .ग्रीको - रोमन संस्कृतीतील अनेकदेवतावाद.या संज्ञेचे अनेक अर्थ आहेत.येशू हा ज्याचा पुत्र आहे तो 'परमपिता ' एकच असून ईश्वर अनेक नाहीत, हा विचार होता.

[9]हा एक इराणी ज्ञेयवादी पंथ होता.पर्शियातील प्रेषित मनी. Latin: Manichaeus or Manes ( 216–276 ) याने स्थापन केला.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

## Augustine of Hippo

Bishop of Hippo Regius
(present-day Annaba, Algeria).
a Latin philosopher and theologian
from Roman Africa.
His writings were very influential
in the development of
Western Christianity.



Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

त्याच्या विचारात दोन प्रमुख प्रवाह दिसतात. ईश्वरशास्त्र या नात्याने तो चर्चच्या अधिकाराची कल्पना सर्वश्रेष्ठ समजतो. पण त्याचबरोबर एक तत्वज्ञ या नात्याने व्यक्तीला येणा-या प्रत्यक्ष ज्ञानाच्या निश्चितीचाही पुरस्कार करतो. त्याच्या दृष्टीने सत्याचे दोन निकष असतात.

## सत्याचे दोन निकष

पहिले, चर्चसारख्या बाह्य धर्मसंस्थेपासून, शब्दप्रामाण्यमार्फत मिळणारे सत्य. दुसरे, आंतरिक ज्ञानापासून मिळणारे सत्य. आंतरिक सत्य हे व्यक्तीच्या प्रत्यक्ष अनुभवापासून मिळते. ऑगस्टीनने आंतरिकतेवर (Internality) भर देऊन तिचे आध्यात्मिक स्वरुप व महत्व विशद करुन सांगितले, ही त्याची सर्वात महत्वाची कामगिरी तत्वज्ञानाच्या या धर्माच्या क्षेत्रात आहे असे कुशमन मानतो.अर्वाचीन तत्वज्ञानाच्या दृष्टीनेही ऑगस्टीनची ही *'आंतरिकतेची'* कल्पना अत्यंत महत्वाची समजावयास पाहिजे.''ऑगस्टीन हा ख्रिश्चन धर्मनिष्ठेचा सुधारक होता'' असे म्हणणे उचित ठरेल. ऑगस्टीनने धर्माधर्मामध्येच खरा धर्म किंवा धर्माचे सार शोधून काढले. तो मानवाच्या अंत:करणात डोकावला व तेथे त्याला तो उच्च श्रेयस वाटला. जेव्हा मानव ईश्वरावर प्रेम करतो तेव्हा त्याला उदात्तता प्राप्त होते व तो उच्च दर्जाचा प्राणी बनतो. यालाच तो *'नवा जन्म' (New Birth)* म्हणतो. या वैयक्तिक धर्मामुळे निसर्ग व ईश्वर हे विभक्त केले गेले तरी नीतिमत्ता व धर्म यांचे मात्र ऐक्य झाले. आणि 'पाप' म्हणजे तरी काय आहे ?

ऑगस्टीनच्या मते माणसाने आपल्या इच्छांमध्ये अडकून राहून एक प्रकारच्या अस्वस्थतेत जगणे,स्वत:ला स्वतंत्र समजण्याची वृत्ती बाळगणे म्हणजेच पाप होय. पाप म्हणजे एक प्रकारची विषयलंपटता व भीती होय. जेव्हा मानव ईश्वरापासून स्वत:ला वेगळा व दूर असल्याचे समजतो तेव्हा जे जे काही त्याच्या अंत:करणात त्याला अनुभवयाला मिळते, म्हणजे संसारी माणसाच्या अंत:करणात ईश्वराव्यतिरिक्त जे जे काही वसते ते ते सर्व पापच समजावयास पाहिजे असे ऑगस्टीन म्हणतो.

## ईश्वराचे अस्तित्व

ऑगस्टीनलच्या तत्वज्ञानाचा केंद्रबिंदु ईश्वर आहे. त्याचे सत्ताशास्त्र, नीतिशास्त्र आणि मानवशास्त्र ही सर्व ईश्वराच्या अभ्यासात एकत्र मिसळून जातात. त्याच्या मते ईश्वराच्या अभ्यासात बुध्दिवाद आणि गूढवाद यांचे बेमालून संमीलन होते. *'' 'सत्य' हे आपण केवळ जाणण्याकरिता शोधता कामा नये तर त्याच्यावर आपणास प्रेम करण्याकरिता आपण ते शोधले पाहिजे ''* असे ऑगस्टीन म्हणतो. तत्वज्ञान हे शहाणपणाचे म्हणजेच ईश्वराचे प्रेम आहे व हा ईश्वर म्हणजे 'पवित्र त्रित्व' (Holy Trinty) आहे, असे त्याचे मत आहे.

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

ऑगस्टीनच्या मते सर्व ज्ञानाचे कारण असणारा, तत्वज्ञानात अभिप्रेत असणारी ईश्वरविषयक कल्पना आणि धर्मातील ईश्वर हे दोन्ही एकच आहेत. ईश्वरी प्रकटनावर श्रध्दा ठेवणे हे सुध्दा ज्ञानाचे एक साधन ठरते. टर्टलीन म्हणते असे की, ''ते अशक्य आहे म्हणून मी त्यावर श्रध्दा ठेवतो'', बरोबर त्याच्याविरुध्द ऑगस्टीन म्हणतो --''तुझा विश्वास बसावा म्हणून तू समज आणि तुला समजावे म्हणून तू विश्वास ठेव.'' मनाच्या ज्या अनेक क्षमताा असतात त्या त्यांच्या परिपूर्ण अवस्थेपर्यत कार्यक्षम होण्यासाठी व मन ज्यावर विश्वास ठेवते त्याचे यथार्थ आकलन होण्यासाठी श्रध्देची गरज असते, असेही ऑगस्टीन म्हणतो. आणि जे आपणास आपल्या दुर्बलतेमुळे समजू शकत नसेल, ते चर्चच्या अधिकारप्रामाण्यावर विसंबून आपण मान्य शकतो. प्लेटोच्या आयडियांना जसे वास्तव अस्तित्व असते तसेच दैवी सत्यास वास्तव व निश्चित अस्तित्व असते.



## ईश्वराचे अस्तित्व

### अनिवार्य सत्

ईश्वराचे अस्तित्व सिध्द करण्यासाठी ऑगस्टीन नवप्लेटोवाद्यांच्या पध्दतीचा उपयोग करतो.या जगातील सर्व वस्तू यादृच्छिक (Contingent) असतात, पण ईश्वर मात्र अनिवार्य असला पाहिजे, या जगात व्यवस्था आहे.ती कोणत्या तरी थोर बुध्दीने घडविली असली पाहिजे. मानवाची सदससद्विवेकबुध्दी त्याला ईश्वर आहे असे सांगते.म्हणून ईश्वर असलाच पाहिजे, असा ऑगस्टीनचा युक्तिवाद आहे. ईश्वर हा सर्व दैवी ज्ञानाचे अपरिवर्तनीय उगमस्थान व पाया असला पाहिजे असे त्याचे म्हणणे आहे.

### जीवनाचे प्रयोजन

त्याचप्रमाणे '*प्रयोजनाचा युक्तिवाद*' वापरुनही तो ईश्वराचे अस्तित्व सिध्द करु पाहतो. सत्य व शिवत्व यांच्या प्राप्तीसाठीच माणसाचा प्रयत्न चालू असतो. जर आपल्या नैतिक व बौध्दिक जीवनाचा आवश्यक आधार म्हणून ईश्वर नसेल तर सत्याची व शिवाची प्राप्ती होणे अशक्यच ठरेल.ईश्वरप्राप्ती हेच मानवी जीवनाचे प्रयोजन असते, माणूस त्याचसाठी जगतो.

### जीवनाची भाषा अपुरी

खरे म्हणजे जीवनाची भाषा फारच अपुरी व दरिद्री आहे, तिची विधेयाची व वर्गीकरण करणा-या पदार्थाची पध्दती अत्यंत सदोष आहे, त्यात ईश्वराचा काय दोष आहे ? आपल्याला भाषेच्या साहाय्याने ईश्वराचे स्वरुप शब्दात नीट मांडता व स्पष्ट करता येत नाही, म्हणून ईश्वरास अस्तित्वच नाही असे समजणे बुध्दिविरोधी, अविवेकी व हास्यापद आहे. खरे म्हणजे आपल्या विचारांचे साचे व पध्दती, भाषेत व्यक्त करण्यास पडणा-या मर्यादा या सर्वांमुळे ईश्वराच्या ज्ञानास ज्या मर्यादा पडतात त्या त्या लक्षात घेऊन मानवाच्या ठिकाणी नम्रतेची व आपल्या अपूर्णतेची खरी जाणीव व्हावयास पाहिजे.

### विश्वनिर्माता

मानवी ज्ञानाची साधने किती तोकडी, अपूर्ण व अपर्याप्त आहेत याची माणसाला खात्री पटावयास पाहिजे असा ऑगस्टीनच्या ईश्वरविषयक दृष्टिकोन आहे. ईश्वराने या जगाची निर्मिती केली आहे. हे जग निर्माण करण्यापूर्वी काहीही अस्तित्वात नव्हते. जडद्रव्य वगैरे कहीच नव्हते. हे जग ईश्वरातून उगम पावलेले नाही. जग निर्माण करण्याची ईश्वरास इच्छा झाली.त्याने शून्यातून निर्मिती केली. स्वत: ईश्वर कालविहीन व दिक्‌विहीन आहे. जगाचीनिर्मिती ही कालिक प्रक्रिया आहे. जग जरी सातत्याने चालू आहे व टिकून आहे तरी त्यातील आकार व वस्तू या नाशवंत आहेत.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

## ईश्वरी योजना :

ईश्वर जरी सर्वसामर्थ्यसंपन्न असला व जगातील सर्व गोष्टींचा निर्माता असला तरी आपण समजतो त्यप्रमाणे दुरिताचा मात्र तो कर्ता नाही. ईश्वराच्या चांगुलपणापासून या जगातील वस्तू स्त्रवतात. त्याच्या उच्चनीच श्रेणीत काही वस्तूंना व घटनांना पूर्णता कमी प्रमाणात लाभत असते. तशा अपूर्ण अवस्थेत त्यांना राहावयास ईश्वराने अनुमती दिलेली आहे. अशा अर्थाने या जगात दुरित आहे. तसे व्यापक भूमिकेवरुन पाहिले तर या जगातील प्रत्येक वस्तूस आणि घटनेस ईश्वरी हेतूत व योजनेत तिचे स्वत:चे असे विशिष्ट स्थान आहेच. कारण ईश्वराने ते निर्माण केलेले आहे.



शिवत्वासाठी किंवा चांगुलपणासाठी दुरित अत्यावश्यक नसते, उलट दुरित म्हणजे चांगुलपणाचा अभाव असते.फक्त अनैतिक भावना ईश्वरी इच्छेच्या विरुध्द असते व अशी अनैतिकता ही मानवाच्या स्वंतत्र व वेगळया इच्छाशक्तीमुळे किंवा अवनती झालेल्या देवदूतांमुळे अस्तित्वात येत असते. वाईट, अशिव व अनैतिक इच्छा ही सदोष असते. कारण ती मानवास ईश्वरापासून दूर नेते.अशा त-हेच्या वाईट इच्छेच्या जाळ्यात मनुष्य सापडेल व तो अनीतिमान होईल हे ईश्वराने आधीच हेरले होते.त्यासाठी त्याने वावही ठेवला होता.मानवाला शिक्षा देऊन त्याला पुन:सन्मार्गावर आणण्याचीही त्याने व्यवस्था करुन ठेवली आहे.

यात महत्वाची गोष्ट अशी आहे की ईश्वर सर्वसामर्थ्यसंपन्न, चांगला व सदभावनाशील तर आहेच पण त्याचबरोबर त्याने मानवावर नैतिक जबाबदारी सोपविली आहे. पण शेवटी मानवास ईश्वरच सदबुध्दी देतो व त्याला आपणांकडे वळण्यास प्रवृत्त व समर्थ करतो आणि अशा दीर्घसूत्री रीतीने तो स्वत:चे वैभव, ऐश्वर्य व सार्वभौमत्व प्रस्थापित करतो अशी ऑगस्टीनची ईश्वरविषयक भूमिका आहे.

ऑगस्टीनने त्याच्यापूर्वीच्या नीतीचा व दीक्षा घेण्याचा मार्ग बदलून त्याला नवा अर्थ व नवे रुप दिले. ईश्वराच्या शांतियुक्त परमानंदात सहभागी होऊन मानवाने सुखी होण्याची नवी कल्पना त्याने धर्मात आणली. कुशमनच्या मते ऑगस्टीनने ख्रिश्चन नैराश्यवादाचे रूपांतर ख्रिश्चन आशावादात केले.

ऑगस्टीनने केलेला अत्यंत महत्वाचा व क्रांतिकारक विचार म्हणजे धर्मभावना ही संपूर्णतया मानवाची व्यक्तिगत व अंत:करणाची बाब असते. धर्म हा बाहेर चर्चमध्ये किंवा मंदिरात व मशिदीत नसतो किंवा कर्मकांड किंवा व्रतवैकल्यात नसतो. ऑगस्टीन म्हणतो की प्रेम, अकृत्रिम व सात्विक विनम्रता आणि जगाच्या मोहावर विजय मिळविण्याचे सामर्थ्य हे धर्माचे प्रमुख घटक आहेत यांनीच मानवास धन्यता लाभते.

---

## सेंट ॲन्सेल्म

कॅंटरबरीचा सेंट ॲन्सेलम (St. Anselm of Canterbury:1033-1109) याचा जन्म उत्तर इटलीतील पिएडमॉटमधील ओस्टा [Aosta] येथे इ. स. 1033 मध्ये झाला.बुर्गुंडीमधील ॲवरान्येस आणि बेक येथे त्याचे सुरवातीचे शिक्षण झाले व नंतर त्याने बेनेडिक्शन ऑर्डरमध्ये प्रवेश केला व 1063 साली बेकचा प्रायर बनला व नंतर 1078 मध्ये मठाधीश बनला. नंतर 1093 मध्ये तो त्याचा शिक्षक, मित्र व धर्मदृष्टया वरिष्ठ अशा लॅंफ्रॅंक [Lanfranc] याच्यानंतर कॅण्टरबरीचा आर्चबिशप बनला.त्याचे हे स्थान धार्मिक क्षेत्रातील जवळजवळ एखाद्या राजासारखे श्रेष्ठ होते.तो ऑगस्टीनच्या परंपरेला असल्यामुळे त्याची पध्दती व वृत्ती ऑगस्टीनसारखी होती. साहजिकच त्याला *‘दुसरा ऑगस्टिन’* म्हणून ओळखले जाते.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org,  9226563052*

## Anselm of Canterbury

Benedictine monk, a philosopher, and a prelate of the church who held the office of Archbishop of Canterbury from 1093 to 1109. Called the founder of Scholasticism






या कालखंडात **विद्यापीठ (University)** ही संकल्पना उदयास आली होती आणि शिक्षण मठशाळेतून मुक्त होत होते. ॲनसेल् हा या संक्रमणाचा साक्षीदार होता. शिक्षण मठातून विद्यापीठाकडे नेले जात असल्याचे त्याने पाहिले होते.तो यावेळी शेवटच्या मठशाळेतील शिक्षक होता.

तो पवित्र जीवन जगणारा व मुक्त चिंतन करणारा धर्माधीश असून त्याची ख्रिश्चन धर्मतत्वार अविचलित श्रध्दा होती. त्याच्या दृष्टीने ख्रिश्चन धर्मतत्वाविषयी कोणत्याही शंका घेण्याचे कारण नाही.  त्याची अशी खात्री पटलेली होती की चर्चने प्रतिपादिलेली सत्ये ही बुध्दिनिष्ठ आहेत असे यथार्थपणे सिध्द करता येऊ शकते.त्याच्या मते ईश्वराच्या अस्तित्वाची सत्यता नि:संशयपणे स्वीकारण्यासाठी आहे. पण त्याची खात्री करुन घेण्यासाठी व ते कोणलाही पटवून देण्यासाठी आपणांस ते सिध्द करुन दाखविता येते, त्याच्या दृष्टीने श्रध्दा व चिकित्साबुध्दी यांच्यात संघर्ष व विरोध नाही. तथापि बुध्दी ही दुर्बल व स्खलनशील असल्याने ती नेहमीच श्रध्देच्या अतिनैसर्गिक प्रकाशाने उजळावी लागते.त्यासाठी म्हणून त्याने **''मला समजावे म्हणून मी विश्वास ठेवतो'' *-[Credo ut intelligam]*** हे मार्गदर्शक सूत्र बनविले.

## ग्रंथसंपदा :

ॲनसेल्मचे मुख्य लेखन म्हणजे *Monologion* (1075-76)  आणि  the *Proslogion* (1077-78) हे दोन ग्रंथ तसेच पुढील चार तत्त्वज्ञानात्मक संवाद *De grammatico* (1059-60), *De veritate*, and *De libertate arbitrii*, and *De casu diaboli* (1080-86).  *Monologion* and *Proslogion*

ॲनसेल्मने ईश्वरविषयक युक्तिवाद या दोन्ही ग्रंथात मांडले.पण प्रसिध्द असा सत्ताशास्त्रीय युक्तिवाद *Proslogion* या ग्रंथात मांडला. त्याची पध्दती प्लेटॉनिक वास्तववादी आहे.त्यानुसार तत्व जेवढे जास्तीत जास्त सामान्य स्वरूपाचे असेल तेवढी अधिक सत्यता त्यात असते. ईश्वर हा सर्वात अधिक सामान्य तत्व असतो व म्हणून तो सर्वात अधिक सत्य आणि निरपेक्षरीत्या सत्य असतो असे तो म्हणतो. ॲनसेल्म तीन गोष्टींसाठी प्रसिध्द आहे

1. **ईश्वरावरील अविचल श्रध्दा**
2. **ईश्वराच्या  अस्तित्वाचा सत्ताशास्त्रीय युक्तिवाद**
3. **पापक्षालन / क्षमाशीलता**

ॲनसेल्मने तत्वज्ञानाचा उपयोग धार्मिक तत्वांचे मंडन व समर्थन करण्यासाठी केला. त्यावेळी त्याने द्वंद्वात्मक पध्दतीचा [Dialectics]  वापर सुरु केला. ख्रिश्चन धर्मावर ज्यांचा आधीच विश्वास होता त्यांची श्रध्देला बौध्दीक अधिष्ठान देण्यासाठी ही पध्दती त्याने वापरली. त्याच्या मते हे जग सत्य सामान्य तत्वांची चढती श्रेणी आहे आणि **धार्मिक विधी, चर्च व दैवी त्रित्व [Trinity]** या त्यांच्या चढत्या पातळ्या होत.त्याने चर्चच्या धर्मतत्वांना तत्वज्ञानाचा आधार दिला. याचे कारण धर्मतत्वांना तत्वज्ञानाची गरज होती असे नाही, पण ख्रिश्चन धर्मतत्वांचे

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



विश्लेषण करुन त्यांचा अर्थ व महत्व विशद करण्यास मदत होते. म्हणून त्याच्या मते तत्वज्ञानाचे कार्य धार्मिक तत्वांचे स्पष्टीकरण करण्याचे असते.ही त्याने केलेली तत्त्वज्ञानात्मक ईश्वरवादाची पायाभरणी होती.

## ईश्वराचे अस्तित्वाचा सत्ताशास्त्रीय युक्तिवाद [Ontological Argument]

सत्ता म्हणजे अस्तित्व.सत् म्हणजे अस्तित्वात असणारे काहीतरी.ईश्वर हीच खरी सत्ता आहे, तोच खऱ्या अर्थाने अस्तित्वात असतो, या युक्तिवादाला सत्ताशास्त्रीय युक्तिवाद म्हणतात. हा युक्तिवाद तत्त्वज्ञानाच्या इतिहासात सुसंगतपणे व तर्कशुध्द रितीने प्रथम ॲन्सेल्मने मांडला.

ॲनसेल्मच्या मते ''आपणास ज्या कोणत्याही सन्मात्राची [Being] कल्पना करता येऊ शकेल, त्या सर्वाहून ईश्वर मोठा आहे'' अशी ईश्वराची व्याख्या करण्यात आलेली आहे.सोप्या रितीने *''ज्याच्यापेक्षा अधिक श्रेष्ठ अशी कोणतीही कल्पना नाही, त्या अत्यंत श्रेष्ठ पुरुषाची कल्पना म्हणजे ईश्वर होय ''.*

ॲनसेल्मच्या मते जगातील प्रत्येक अस्तित्व म्हणजे वस्तू, घटना, पदार्थ अथवा व्यक्ति यांची सत्ता कधी हा कधी नष्ट होते. म्हणजे त्या अपूर्ण असतात.सत्तेचा अभाव ही ती अपूर्णता असते.पण ईश्वराची संकल्पना अशी आहे की ईश्वर नाही, त्याच्या 'अस्तित्व' या गुणाचा अभाव आहे, असे आपण म्हणूनच शकत नाही, याचाच अर्थ ''ईश्वर अस्तित्वात आहे'' असेच म्हणावे लागते. कारण ईश्वर हीच अंतिम, परिपूर्ण सत्ता आहे आणि तिच्यावरच सारे विश्व अवलंबून आहे. संक्षेपात ईश्वराची म्हणजेच सत्‌ची संकल्पना अस्तित्वात आहे. हाच ईश्वरविषयक सत्ताशास्त्रीय युक्तिवाद होय.

मग अशा ईश्वराचे अस्तित्व आहे तरी कुठे, त्याचे स्वरूप काय, त्याचे ज्ञान कसे होते ? इत्यादी प्रश्न निर्माण होतात. ॲनसेल्मच्या मते ही संकल्पना मानवी मनात आढळते खरी पण हा परिपूर्ण ईश्वर मानवी मनाच्या बाहेरच अस्तित्वात असला पाहिजे, कारण तो जर मनाबाहेर नसला तर ज्या कशाचा विचार करता येतो त्यापेक्षा तो मोठा असू शकणार नाही. म्हणून ईश्वर हा केवळ मनातच वसतो असे नाही तर ज्याच्या सारास अनुलक्षून मन विचार करते अशा रितीची तो सद्वस्तू असतो व त्याला *मन निरपेक्ष* असे स्वतंत्र वास्तव अस्तित्व असते.

वर वर पाहाता हा युक्तिवाद मानसशास्त्रीय पातळीवरील वाटतो. पण तो केवळ मानसशास्त्रीय स्वरूपाचा राहून चालणार नाही. *'परिपूर्ण वस्तू अस्तित्वात असते'* असे म्हणताना आपण जे अस्तित्वात नसते त्याहून अस्तित्वात जे असते ते अधिक पूर्ण असते असा विचार करीत असतो.ते पूर्ण म्हणजे '*सामान्य* 'या स्वरूपाचे असते आणि अशी ही सामान्ये ही मनाच्या बाहेर अस्तित्वात असतात, असे गृहिततत्व असते. त्याचा अर्थ परिपूर्ण सामान्यविषयक विचार परमश्रेष्ठ सत्‌शी (ईश्वराशी )जोडलेला असतो असा होतो. कारण ईश्वरच अंतिम परिपूर्ण सत् आहे !!

खरे म्हणजे जो अवतार घेण्यास व मानवजातीला मुक्ती देण्यास राजी आहे.अशा त-हेच्या व्यक्तिमत्व संपन्न ख्रिश्चन व्यक्तिगत ईश्वराची (Personal God) कल्पना ॲन्सेलमच्या मनात होती, असे दिसते.कारण ख्रिस्ती धर्मानुसार माणूस मुळात पापमूलक आहे, त्याचा जन्मच पापातून होतो. पण कायमस्वरूपी माणसाला पापात ठेवणे, हे या धर्माला परवडणारे नव्हते. माणसाला मुक्ति देणे गरजेचे होते. त्यामुळे मानवजातीला **'मुक्तिदाता प्रेषित'** हवा होता, ती मानसिक व वैचारिक अनिवार्यता ॲनसेल्मने त्याच्या युक्तिवादातून भागवली. त्याने ख्रिश्चन धर्मातील त्रित्व तत्त्वाचे समर्थनही झाले आणि पापक्षालनाचा मार्गही मोकळा झाला.

''ईश्वर स्वत: मानव का बनला?'' तर अन्सेल्मच्या मते माणसाच्या ठिकाणी पापवृत्ती आहे ती ईश्वराच्या प्रभावाविरुध्द एक प्रकारचा गुन्हा आहे, आणि दैवी न्यायाशी झगडल्याशिवाय त्या पापवृत्तीला क्षमाही करता येत नाही. त्याच्या या घोर गुन्हयाबददल समाधान देण्यास मानव असमर्थ असल्याने ईश्वराचा अवतार हा एक प्रकारचा **पर्याय (Substitution)** म्हणून ॲनसेल्मने मांडला. त्यासाठी ईश्वरच मानवाचे रुप घेऊन ख्रिस्त बनतो, अमर्याद पुण्य संपादन करतो व त्या पापाची पूर्ण भरपाई करतो.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

दुसरे असे की ईश्वराचा न्याय हा कधीही बदलत नसतो व त्याच्या शुध्द संकल्पशक्तीतून तो व्यक्त होत असतो, ही श्रध्दाही जागवावयाची होती. ईश्वररूपी परमसत्ता 'सामान्या'मध्ये सहभागी होत असते तिचे साररुप संकलपनांच्या मार्फत सिध्द करता येते, असा दावा तो करतो.हा ॲन्सेलमचा वास्तववाद होय. ज्याप्रमाणे एका वर्गातील अनेक वस्तूंची वास्तवता एकच असते आणि तिच्यात एकता असते, त्याप्रमाणे त्रित्वातील अनेक व्यक्ती एक असतात, मानव जातीतील असंख्य घटक-मानव एकच मानव बनतात. यावरुन मानव हा व्यक्तीपेक्षा अधिक असतो हे सिध्द होते.

ईश्वराच्या अस्तित्वाचा दुसरा युक्तिवाद ॲन्सेलमने त्याच्या Monologium या ग्रंथात मांडला, तो विश्वव्यवस्थिती/ **विश्वशास्त्रीय युक्तिवाद (Cosmological Argument)** होय. या युक्तिवादानुसार या जगात न्याय व चांगुलपणा यांचे कार्य व्यवस्थित रीतीने व अव्याहतपणे चालावयाचे असेल तर त्यांना आवश्यक अशी सुसंवादी व पोषक विश्वरचना त्यांच्यामागे असावयास पाहिजे. तशी आपोआप निर्माण होणे शक्य नाही. या विश्वात ज्या अर्थी सुसंवादी, अर्थपूर्ण व न्यायास पोषक अशी रचना, व्यवस्था व कार्यपध्दती आहे त्याअर्थी ती घडविण्यास कारणीभूत ईश्वरासारखी महान, सर्व सामर्थ्य संपन्न, न्यायी, शिवरुप अशी सर्वगामी बुध्दी असली पाहिजे.तोच ईश्वर होय.

--------------------------------------------------------------

## सेंट टॉमस ॲक्वायनस

सेंट टॉमस अक्वायनस (St. Thomas Aquinas:1224/ 25--1274) हा *एन्जलिक डॉक्टर (Angelic Doctor)* म्हणून ओळखला जातो. त्याचे जीवन अत्यंत शुध्द व पवित्र होते व त्याची सत्यावरील निष्ठा पराकोटीची प्रामाणिक होती.इटलीतील नेपल्सजवळ असलेल्या रोकॅसेकाच्या किल्ल्यात 1224 च्या शेवटी किंवा 1225 च्या सुरुवातीस त्याचा जन्म एका कुलीन घराण्यात झाला. त्याचा पिता अक्विनोचा काउंट (Count) होता.

**Thomas Aquinas** (1225–07March1274), also **Thomas of Aquin** or **Aquino**, an Italian Dominican priest of the Catholic Church, and an immensely influential philosopher and theologian in the tradition of scholasticism, known as **Doctor Angelicus**, **Doctor Communis**, or **Doctor Universalis**



टॉमसच्या काळात अरबी, ज्यूइश विचार आणि स्कोलॅस्टिकवाद परमोत्कर्ष बिंदूवर होते.त्याच काळात ॲरिस्टाटललाही मान्यता मिळू लागली होती. ॲरिस्टॉटल आणि खिस्ती जगत यांचा मिलाफ करणारा टॉमस हाच पहिला अध्वर्यू होता. त्यासाठी टॉमसने धर्मशास्त्रे, ग्रीक तत्वज्ञान व त्याचे पूर्ववर्ती खिश्चन तत्वज्ञ यांच्या विचारांतून व समकालीनांच्या विचारांतून महत्वाच्या व संबध्द कल्पना निवडून त्या आत्मसात केल्या. विचारासाठी संपूर्ण विश्व ठेवले. खिश्चन ईश्वरशास्त्र आणि ॲरिस्टॉटलच्या सत्ताशास्त्रानुसार *'ईश्वर हाच या विश्वाचे प्रकटन आहे '* अशा

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

रीतीने ईश्वरशास्त्राचा अर्थ लावण्याचा प्रयत्न ॲक्विनासने केला. ॲक्विनासच्या आधी धर्मवेत्त्यांनी आणि ख्रिश्चन तत्वज्ञ मंडळींनी वेगवेगळ्या विचारांची मांडणी केली होती. या विचारात बऱ्याचदा परस्परविरोधी कल्पना मांडल्या होत्या. ॲक्विनासने ॲरिस्टॉटलच्या मध्यवर्ती तत्वांच्या साहाय्याने या साऱ्यांमधील विरोधांमध्ये प्रकारे समन्वय केला. त्याचे सारे तत्त्वज्ञान म्हणजे या प्रयत्नांची संक्षिप्त रुपाने केलेली गुंफण आहे.

## ॲरिस्टॉटलचा आणि ख्रिश्चनांचा जगाविषयीचा दृष्टिकोनाचा समन्वय

### ( निसर्ग आणि ईश्वर : द्विविध सत्याची ॲक्विनासची संकल्पना )



ख्रिश्चन धर्माचा संबंध प्राचीन ग्रीक संस्कृतीशी व विज्ञानाशी घनिष्ठ प्रस्थापित करावा, हे ॲक्विनासच्या जीवनाचे ध्येय होते. ज्ञानाच्या सर्व वैज्ञानिक विभागांना योग्य, उचित महत्व व स्थान मानवी जीवनात मिळावेतच पण त्या सर्व क्षेत्रांवर धर्माचे वर्चस्व टिकवून ठेवण्याचा टॉमसचा प्रयत्न होता. याचाच अर्थ त्याला ख्रिश्चन धर्म व ॲरिस्टॉटल यांना एकत्र आणावयाचे होते. कारण त्याच्या दृष्टीने ॲरिस्टॉटल हा प्राचीन संस्कृतीचे परिपक्व पूर्ण फळ होता.

ॲरिस्टॉटलने निसर्गाचा शोध घेवून विज्ञाने निर्माण केली. त्यांना व जगताला ईश्वरी कृपेची जोड देण्याचे काम ॲक्विनासने केले. त्याला सर्वांमध्ये सुव्यवस्था निर्माण करण्याचे वेड होते.त्या कल्पनेने प्रेरित होऊन त्याने जीवनाचे इतके व्यापक व सर्वस्पर्शी दर्शन घडविले की त्यात त्याने त्याच्या सर्व प्रश्नांचा अंतर्भाव केला. इंद्रियगम्य सृष्टीतील निसर्ग व ईश्वरी प्रकटन या दोघांमध्ये तफावत व विरोध राहाता कामा नये अशी त्यांची धारणा होती. हे उध्दिष्ट गाठण्यासाठी ॲक्विनासने वस्तूंविषयी मूल्यांकन ॲरिस्टॉटलच्या साह्याने दाखविण्याचा प्रयत्न केला.

तो त्याच्या स्वत:च्या नवप्लेटोवादी चष्म्यातून ॲरिस्टॉटलकडे पाहात असता त्याला ॲरिस्टॉटलमध्ये (वस्तुस्थितीने मान्य केला असता ) त्यापेक्षा अधिक आंतरिक व धार्मिक आशय व महत्व पाहावण्यास मिळाले. ॲक्विनासला ही गोष्ट स्पष्ट दिसत होती की ॲरिस्टॉटलच्या मतानुसार निसर्ग हा आयडियांच्या अंशांच्या श्रेणीनुसार साराचे प्रकटीकरण करीत असतो. ॲरिस्टॉटलची ही कल्पना ॲक्विनासच्या तत्वज्ञानात मध्यवर्ती तत्व बनून राहाते. तिला जणू "ईश्वरी कृपेच्या सृष्टीत निसर्ग हा बाह्यरुपपेक्षा (Sketch in Outline) असतो " हा दर्जा मिळतो.

## दोन सत्ये

ॲक्विनासच्या मते धार्मिक मनोवृत्तीच्या माणसाच्या मनाला ही दोन सत्य दिसावीत.

(1) श्रध्देची सृष्टी व निसर्गाची सृष्टी या दोन भिन्न सृष्टी आहेत
(2) श्रध्देची सृष्टी ही निसर्गसृष्टीचेच अखंडितपणे विकसित झालेले रुप आहे.

ईश्वरी कृपेची सृष्टी (The World of Grace) व निसर्गसृष्टी या एकाच संपूर्ण अस्तित्वाच्या दोन पातळया आहेत.निसर्ग हा विकासाची खालची पातळी असतो आणि त्याचा ईश्वरी कृपेच्या सृष्टीशी मानवी आत्म्याच्या मार्फत स्पर्श होतो.

थोडक्यात ॲक्विनासच्या मते धर्म व तत्वज्ञान यांची क्षेत्रे भिन्न आहेत.पण ते परस्परांचे विरोधक नाहीत व असावयाचे कारण नाही. ईश्वरी कृपा निसर्गाचा नाश करीत नाही, तर उलट त्याला पूर्णता देते. त्याचा अर्थ असा की निसर्ग ईश्वरी कृपेपुढे दुय्यम असतो.म्हणजेच मानव समाज धर्माच्या मानाने गौण आहे. ॲक्विनास ख्रिश्चन धर्मीय असल्याने त्याच्या मते ख्रिश्चन धर्मापुढे मानवी समाज गौण आहे,पर्यायाने राज्यसंस्थेचे स्थान चर्चपुढे गौण ठरते व सम्राटसुध्दा पोपच्या मानाने गौण असतो.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

ईश्वरशास्त्र (Theology) ईश्वराचा व दैवी सत्यांचा विचार करीत असते. तत्वज्ञान तसा विचार करीत नाही. पण ॲक्विनासच्या मते हा काही दोघांमधील मुख्य फरक नाही.कारण तत्वज्ञानही दैवी सत्यांची चर्चा करीत असते. पण फरक त्यांच्या बघण्याच्या दृष्टीकोनामध्ये असतो.तो असा की ईश्वरशास्त्र सत्याकडे ईश्वरी प्रकटनाच्या प्रकाशात पाहाते तर तत्वज्ञान त्यांच्याकडे विमर्शबुध्दीच्या प्रकाशात पाहाते, म्हणून सत्ये ही भिन्न प्रकारांची असतात. काही सत्ये तत्वज्ञानाची असतात, काही ईश्वरशास्त्रात येतात तर काही सत्ये दोघांमध्ये बसतात. उदाहरणार्थ ईश्वराचे अस्तित्व, आत्म्याचे अमरत्व आणि जगाची ईश्वराशी असणारा संबंध यांसारखे प्रश्न ईश्वरशास्त्रीय प्रश्न आहेत. अर्थात त्यांची तात्विक बुध्दीनेही मांडणी करुन दाखवता येते. पण त्रित्व (Trinity), अवतार [Incarnation] व कालिक सर्जन [Temporal Creation] यांचे रहस्य तात्विक बुध्दीच्या आवाक्याच्या पलीकडचे असते व ते ईश्वरीशास्त्राच्या प्रांतात मोडते.



ॲक्विनासच्या मते मते तत्वज्ञान व ईश्वरशास्त्र भिन्न असली तरीही त्यांच्यात सुसंवाद असतो. कारण ईश्वरशास्त्र तत्वज्ञानास श्रध्देचा आधार देते आणि तत्वज्ञान ईश्वरशास्त्राला तार्किक आधार देते. तत्त्वज्ञान ईश्वरशास्त्राला पुढील आधार पुरविते :

[1] प्रारंभीचे हेतू प्रस्थापित करते.

[2] साम्ये पुरविते

[3] ईश्वरशास्त्रावरील आक्षेपांना उत्तरे देते.

हे तत्त्वज्ञानाने केलेले ईश्वरशास्त्राचे पुष्टीकरणच असते.

## दोन प्रकटने : प्लेटोच्या प्रभावाचे दर्शन

ॲक्विनासच्या मते इतिहासात ईश्वराचे दोन रितीनी प्रकटन होते. एक ख्रिस्ताच्या रुपाने आणि दुसरे मानवातील मुक्तिची आशा. दुसरे पहिल्यापेक्षा श्रेष्ठ प्रकटन असते. हा विलक्षण प्रांत असून तो मानवाच्या प्रत्यक्ष ताब्यात असण्यापेक्षा त्याच्या आशेतच [Hope] अधिक वसत असतो. ॲक्विनासच्या या कल्पनेत त्याच्यावर पडलेला प्लेटोच्या प्रभावाचे स्पष्ट दर्शन होते. गूढ रीतीने हे व्यक्तीचे ईश्वराशी होणारे प्रत्यक्ष मीलन असते. ही कल्पना म्हणजे टॉमसने बांधलेल्या धर्ममंदिराचा घुमटच होय. पण त्याचबरोबर हे स्वर्गीय वैभव मानवाला चर्चची मदत घेतल्याशिवाय प्राप्त होऊ शकणार नाही असे आग्रहाने प्रतिपादन करण्याइतका टॉमस दक्ष होता.म्हणजे चर्चची मदत न घेता केवळ स्त:च्या प्रयत्नांच्या बळाने मानव ईश्वरापर्यंत पोहोचू शकत नाही.धार्मिक जीवनाच्या रहस्यमय पार्श्वभूमीतून चर्चकडून मिळणा-या धार्मिक संस्कारांचीही मानवाला तितकीच गरज असते असे ॲक्विनास म्हणतो.

टॉमसचा सर्वात महत्वाचा ग्रंथ Summa Contra Gentiles हा आहे व तो त्याने 1259-64 या काळावधीत लिहिला होता. ख्रिश्चन धर्माचे सत्य प्रस्थापित करण्यासाठी जे ख्रिश्चन नाहीत त्यांच्यासाठी हा ग्रंथ लिहिला आहे. Summa Theologiae हा त्याचा दुसरा महत्वाचा ग्रंथ असून तो मुख्यत: अरबी तत्वज्ञानाचा परिचय असणाऱ्यासाठी आहे.

## ईश्वर व त्याचे अस्तित्व :

ॲक्विनासच्या मते ईश्वराचे अस्तित्व सिध्द करण्यासाठी जर काही युक्तिवाद करावे लागले तर त्यात काही नुकसान नाही. कारण ईश्वराच्या अस्तित्वाची कल्पना मानवाच्या मनात उपजत [Innate] नसते.याचे कारण असे की ईश्वर अस्तित्वात आहे , या विधानाच्या विरुध्द अर्थाचे ईश्वर अस्तित्वात नाही, असे विधान करता येते. खरे म्हणजे

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

आपण ज्या जगात राहतो त्यात ईश्वर नसल्याने सर्वसाधारण मत आहे हे ठामपणे सांगण्यासाठी काही युक्तिवाद वापरण्यास कोणतीच हरकत असू नये असे ॲक्विनासचे मत आहे.

सेंट जॉन दमासीनचे [St, John Damascene] असे म्हणणे आहे की ईश्वराविषयीचे ज्ञान माणसाच्या ठिकाणी सहज किंवा उपजत असते. पण ॲक्विनास म्हणतो माणसाला सुख [Beatitudo] मिळविण्याची नैसर्गिक इच्छा असते. खरे सुख हे जरी ईश्वरामध्ये शोधावयाचे असले तरी प्रत्येक व्यक्तीला ईश्वराचे नैतिक ज्ञान झालेले असतेच असे नाही.पण ज्या अर्थी माणसला स्वकल्याण हवे असते, त्या अर्थी त्याच्यात कल्याणाची संदिग्ध, कल्पना वसत असते, पण ती स्पष्ट नसते. मानवी कल्याण विषयसुखात व संपत्तीच्या स्वामित्वात असते असेही वाटणे शक्य आहे.पण खरे कल्याण ईश्वरात लाभते हे त्याला समजण्यापूर्वी कल्याणाविषयी त्याने चिकित्सक विचार करण्याची आवश्यकता असते. थोडक्यात अस्तित्वासाठी लागणा-या सिध्दीचा पाया हा माणसाला वाटणा-या नैसर्गिक कल्याणाच्या इच्छेत असतो. तथापि तो स्पष्टपणे सिध्द करण्याची आवश्यकता राहतेच.



ईश्वराचे अस्तित्व सिध्द करण्यासाठी जे वेगवेगळे युक्तिवाद करण्यात येतात त्यांत सेंट ॲन्सेल्म याचा सत्ताशास्त्रीय युक्तिवाद [Ontological Argument] किंवा अनुभवपूर्व [Apriori] सिध्दीचा युक्तिवाद यांचा समावेश आहे. त्याविषयी तो म्हणतो की *ज्याच्यापेक्षा मोठे काही आहे* अशी कल्पना करवत नाही तोच ईश्वर ही कल्पना प्रत्येक मनुष्य समजत नाही म्हणून ती माणूस स्वीकारत नाही, असा ॲनसेल्मचा युक्तिवाद आहे .

या युक्तिवादांवर ॲक्विनास आक्षेप घेतो. ॲक्विनासचे मत मते ॲन्सेल्मच्या या युक्तिवादात आदर्श व्यवस्थेकडून प्रत्यक्ष व्यवस्थेकडे नेणारे एक प्रकारचे अयुक्त संक्रमण [Illicit transition] दिसते.म्हणजे असे की जर ईश्वराचे अस्तित्व अनुभपूर्वरीतीने, ईश्वराच्या कार्याचे किंवा परिणामांचे परीक्षण करुन (म्हणजे अनुभवोत्तर रीतीने [Aposteriori] त्याचे अस्तित्व सिध्द करावयास पाहिजे. हा युक्तिवाद मान्य केला तरीही ईश्वराची कार्ये किंवा निर्मित वस्तू [Effects] या सान्त किंवा मर्यादित [Finite] आहेत व ईश्वर मात्र अनन्त [Infinite] आहे , असा निष्कर्ष निघतो.म्हणजे त्या दोघांमध्ये, म्हणजे कार्य व कारण यांच्यामध्ये प्रमाणशीरता राहात नाही.म्हणून हे दोन्ही युक्तिवादावर आक्षेप घेता येतो. त्यासाठीच सुधारित युक्तिवाद तो देतो. तो पुढीलप्रमाणे :

### [1] अचल चालक

हा युक्तिवाद ॲरिस्टॉटलने केलेल्या युक्तिवादासारखाच आहे. आपल्या अनुभवास असे येते की जगातील अनेक वस्तू हलत असतात किंवा गतिमान असतात व त्यांना इतर वस्तू गती देतात, त्यांना आणखी इतर वस्तू गती देतात व असे करता करता व मागे जाता जाता कोठेतरी थांबावे लागेल. नाहीतर अनवस्था प्रसंग ओढवेल. म्हणून जगातील सर्व गतींच्या प्रारंभी त्यांचे कारण असेल ते स्वत: अगतिमान किंवा अविचलित [Unmoved] असेल. मात्र जगातील सर्व गतीना ते प्रेरक व जबाबदार असेल, जगाच्या प्रारंभी असणारे असे आदी प्रेरक तत्व म्हणजेच ईश्वर होय.

### [2] मूळ निमित्तकारण

काहीही स्वत:चे कारण असू शकत नाही. कारण तसे असण्यासाठी ते स्त:च्या आधी अस्तित्वात असावे लागेल.अशा प्रकारे एका मोठया निमित्तकारण-श्रेणीत मागे जाता जाता पहिल्या किंवा मूळ निमित्त कारणापाशी थांबावे लागेल व असे मूळ निमित्तकारण ईश्वर असला पाहिजे.

### [3] अनिवार्य व अविनाशी अस्तित्व

जगात काही प्राणी व वस्तू अस्तित्वात येतात व नाश पावतात. म्हणजे त्यांचे जीवन विनाशी असते. म्हणजे ते असतात व नसतातही. म्हणजे त्यांना नैमित्तिक किंवा आपातिक [Contingent] अस्तित्व असते. पण

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

त्यांच्यामागे अविनाशी व नित्य असे काहीतरी आवश्यक किंवा अनिवार्य [Necessary] अस्तित्व असल्याशिवाय नैमित्तिक अस्तित्व शक्य होणार नाही आणि असे अनिवार्य व अविनाशी अस्तित्व म्हणजे ईश्वर असला पाहिजे.

### [4] सर्वोच्च अस्तित्व

या जगात असणा-या वस्तूंना कमी-अधिकपणा किंवा अंशात्मकता असते. म्हणजे तरतम भावानुसार काही कमी तर काही अधिक चांगल्या, सुंदर, पूर्ण किंवा सत्य असतात. म्हणजे त्यांना तुलनात्मक रीतीने समजावे लागते.याचाच अभिप्राय असा आहे की जगात तमभावाने म्हणजे सर्वात मोठे, श्रेष्ठ किंवा अधिकाधिक प्रमाणात व परिपूर्ण किंवा पूर्णतम असे काही अस्तित्वात असले पाहिजे व ते म्हणजे सर्वोच्च अस्तित्व [Maximeens] म्हणजेच ईश्वर असला पाहिजे.हा युक्तिवाद ऑगस्टीन व ॲन्सेल्म यांच्याही विचारात सापडतो.



### [5] जगाचा नियंता, शिल्पकार, आयोजक किंवा अभिकल्पक [Designer]

ईश्वरसिध्दीसाठी ॲक्विनास प्रयोजनवादी[10] युक्तिवादाचा सुध्दा उपयोग करतो.या जगातील जड वस्तूंना स्वत:चे असे प्रयोजन,उद्दिष्ट किंवा हेतू नसतो. त्यांचा उपयोग इतर बुध्दिमान प्राणी त्यांची उदिष्टे प्राप्त करुन घेण्यासाठी करीत असतात. जड वस्तूंना त्यांच्या हेतूची किंवा कार्याची जाणीव नसते. कोणताही हेतू साध्य होण्यासाठी त्यांना कोणीतरी बुध्दिमान शक्तीने दिशा दाखवावी लागते. या जगात व्यवस्था, साधने व साध्य यांच्यांत मेळ व ऐक्य असण्यासाठी अंतिम बुध्दियुक्त कारण असलेच पाहिजे.म्हणजेच या जगाचा नियंता, शिल्पकार, आयोजक किंवा अभिकल्पक [Designer] असला पाहिजे. व तो म्हणजे ईश्वर असला पाहिजे.या प्रकारचा युक्तिवाद नंतर कान्टनेही मांडला आहे.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

## ईश्वराचे स्वरूप

एकूण टॉमसच्या मते ईश्वर हा विश्वाचे आदी, अंतिम व हेतुयुक्त कारण असतो. ईश्वर हा शुध्द साक्षातता किंवा वांस्तविकता [Pure Actuality] किंवा शक्ती असतो. तो जर केवळ सुप्तक्षमता असता तर त्याला साक्षात करण्यासाठी इतर कशाची तरी गरज लागली असती.मग तो आदिकारण होऊ शकला नसता. ईश्वर शुध्द साक्षातता, वास्तविकता असल्याने तो संपूर्णपणे निरवयव व परिपूर्ण असतो. तो पूर्ण बुध्दी, पूर्ण चैतन्य व पूर्ण संकल्पशक्ती असतो.

ईश्वराने जडद्रव्यासहित हे जग शून्यातून निर्माण केले. जर ईश्वर सर्वांचे आदिकारण असेल तर तो द्रव्य व आकार या दोघांचा निर्माता असला पाहिजे. तो जडद्रव्यविरहित शुध्द चैतन्य [Pure Spirit] असल्याने त्याच्यापासून जडद्रव्य उदभवू शकले नसते. म्हणून ईश्वराने जडद्रव्य शून्यातून निर्माण केले असले पाहिजे.

तथापि विश्वाला कोणत्या कालात प्रारंभ झाला होता ते तात्विकरीत्या सिध्द करणे अशक्य आहे. शून्यातून निर्मिती होणे याचा सरळ अर्थ एवढाच आहे की या जगाची उत्पत्ती ईश्वरामुळे झालेली आहे. म्हणजे ईश्वर हा जगाचे अनिवार्य कारण आहे. ते तात्कालिन किंवा सनातन सर्जन सुचवीत नाही.

याचा अर्थ विश्वाला विवक्षित कालात प्रारंभ झाला, असे मानता येत नाही.विश्वासाठी आपण ईश्वराच्या प्रकटनावर किंवा साक्षात्कारावर [Revelation] अवलंबून रहावे लागते.उलट जगाच्या निर्मितीपासूनच कालाला प्रारंभ झाला. ईश्वराने जगाची नुसती निर्मितीच केली नाही तर कालाच्या प्रत्येक क्षणात त्याच्या अस्तित्वाला ईश्वरच जबाबदार असतो. म्हणजे ईश्वर जी निर्मिती करीत असतो ती अखंडितपणे सातत्याने चालू असते, असे मानावे लागते.

---

[10]हा युक्तिवादाचा William Paley (1743 - 25 - 1805) या ब्रिटीश विचारवंताने त्याच्या *Natural Theology* या ग्रंथात मांडला.

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

*शक्य असलेल्या जगामध्ये हे जग सर्वोत्तम* आहे म्हणून या जगाची ईश्वराने निवड करण्याचे कारण त्याची संकल्पशक्ती शिवाने निर्धारित केलेली असते. कारण उघडच हे आहे की ईश्वर स्वत:च सर्वोत्तम असल्याने साहजिकच ईश्वर फक्त जे सर्वोत्तम असते, त्याचीच इच्छा धरु शकतो. निर्मितीमागे ईश्वराचा हेतू सर्व शक्य प्रकारांनी स्वत:ला व्यक्त करणे हा असल्यामुळे तो अस्तित्वाच्या सर्व शक्य पातळ्या निर्माण करीत असतो.हा युक्तिवाद नंतर लायब्नीजने स्वीकारला.

थोडक्यात ईश्वर सर्वोत्तम असतो.तोच स्वत:ला जगाच्या स्वरूपात प्रकट करतो.जगाचे ज्ञान म्हणजेच ईश्वराचे ज्ञान असते.जगाला जाणणे हेच ईश्वराला जाणणे असते.इथे ॲक्वीनास ॲरिस्टाटलच्या निसर्ग विज्ञानांना आणि समाजविज्ञानाला ईश्वरीय आधार देतो.जणू काही तो ॲरिस्टॉटलमध्ये असलेली कमतरता पूणे करतो.ॲरिस्टॉटलला तो ख्रिस्ती धर्माचा आधारच बनवितो.म्हणून नंतरच्या कालावधीत ख्रिस्ती जगतात ॲरिस्टाटल अनिवार्य बनला. न्यूटनसारख्या अनेक वैज्ञानिकांनी विज्ञान मांडूनही ईश्वर स्वीकारला.

-----------------------------------------------------------

## पीटर ॲबेलार्ड

## संकल्पनावाद

पीटर ॲबेलार्ड (Peter Abelard 1079-1142) चा जन्म 1079 साली फ्रांसमधील नान्टेसजवळ पॅलेट [Pallet] येथे झाला.त्याचे पूर्वज सैनिकी पेशात होते. ॲबेलार्डचे जीवन वादळी होते.त्याने रोसेलिन [Roscelin] व शांपोचा विल्यम (William of Campeaux)[11] यांच्याजवळ अध्ययन कले होते.मध्युयगीन कालखंडातील हा फ्रेंच स्कोलॅस्टकीवादातील सर्वात श्रेष्ठ तर्कज्ञ होता.

ॲबेलार्डचे जीवन रोमांचकारी व डोळ्यात भरणारे होते. त्याला विवादात पडणे आवडत असे व आपला विजय होणार असे तो आधीच सांगत असे. कित्येक वेळा पाखंडी म्हणून त्याला दोषी ठरविण्यात आले होते. त्याचे De trinitate हे पुस्तक तर जाळून टाकण्यात आले होते. त्याच्या विचारांमुळे 1140 मध्ये त्याला करावास पत्करावा लागला होता.त्याने ॲन्सेलमजवळ ईश्वरशास्त्राचाही अभ्यास केला होता.तो लढाऊ वृत्तीचा, वादपटू व बुध्दीवादी होता. त्याला कोणतीही बंधने सहन होत नसत. त्याची वृत्ती अधीरपणाची होती. आपली बुध्दी असाधारण दर्जाची आहे असे प्रदर्शन करण्यास त्याला अभिमान वाटत असे.तो निर्भय वृत्तीचा होता.तो कोणत्याही सिध्दान्ताची चिरफाड करण्यात माघार घेत नसे.

फ्रान्समध्ये एका शहरात शिकवीत असताना त्याची प्रचंड वाहवा व कौतुक झाले. त्यामुळे तो अतिशय सुखावला व इतका हुरळून गेला कि शेवटी *मी या काळातील सर्वश्रेष्ठ तत्वज्ञ आहे* असे त्याने जाहीर केले. पण नंतर त्याच्या दुर्भाग्याने त्याला वाईट दिवस आले. त्याच्यावर बंदी घालण्यात आली व त्याला कोणीही मित्र राहिला नाही. तो या मठातून त्या मठात अशी भटकत असता 1124 मध्ये त्याला मृत्यू आला.

ॲबेलार्डची बुध्दी मात्र कुशाग्र, स्वच्छ, मर्मभेदक व उत्कट स्वरुपाची होती. त्याला गूढगुंजन, संदिग्धता, गोंधळ मुळीच सहन होत नसे. त्याचे झगडे त्याच्या गुरुंशीही झाले होते व वयाच्या अवघ्या बाविसाव्या वर्षी त्याने मेलन येथे व नंतर पॅरिसमध्ये स्वत:ची शाळा सुरु केली होती. तो अत्यंत प्रभावी व यशस्वी शिक्षक समजला जात असे. ***'स्टोरी ऑफ कलॅमिटीज्'*** या आत्मचरित्रात त्याचे वादळी जीवन चित्रित केले आहे.

---

[11] शांपोचा विल्यम (1070 ते 1121) याने मध्ययुगातील सामान्य विषयक वादविवादात प्रमुख भूमिका बजावली.'सामान्य' विषयक त्याचे मूळ लिखाण उपलब्ध नाही, पण त्याचा शिष्य ॲबेलार्डच्या लेखनात ती स्पष्ट होते.विल्यमने ' ऐक्य सिध्दान्त ' मानला असावा.



Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

**Peter Abelard**

(1079 – April 21, 1142)
medieval French scholastic philosopher, theologian and preeminent logician. The story of his affair with and love for Héloïse has become legendary. The Chambers Biographical Dictionary describes him as "the keenest thinker and boldest theologian of the 12th Century





## सामान्य विषयक सत्ताशास्त्रीय समस्या:

मध्युगात 'सामान्य' (concept of Universals) विषयक मोठा वाद झाला. 'सामान्यविषयक' सिध्दांताची मांडणी प्रथम प्लेटोने केली होती.ती त्याने 'आयडिया सिध्दान्त' या रूपाने निश्चित केली. मध्ययुगात ही समस्या पुन्हा चर्चेला आली.त्यावेळी तीन भूमिका मांडण्यात आल्या.वास्तववाद, नामवाद आणि संकल्पनावाद. मध्युगात या संवल्पनेविषयी तार्किक आणि ऐतिहासिक विश्लेषण करण्यात आले.

(1) नामवादाच्या मतें विशेष किंवा विविक्षित वस्तु ह्याच फक्त सत्य असून तथाकथित सामान्यें म्हणजे शब्दांकित प्रतीके असतात. ती प्रतीके अनेक विवक्षित वस्तूंना एका शब्दाने व्यक्त करणारी संक्षिप्त रुपे असतात.

(2) संकल्पनांवादाच्या मताप्रमाणे देखील विविक्षित वस्तुच सत्य असतात व सामान्यें केवळ मानसिक संकल्पना असतात, त्यांना वास्तव जगांत अस्तित्व नसतें. म्हणजे सामान्य मानवी मनाबाहेर असूच शकत नाही.

(3) वास्तववादाच्या मतें मात्र फक्त सामान्यें केवळ वस्तुनिष्ठ व सत्य असतात.सामान्ये वस्तू निर्माण होण्यापूर्वी ही असतात, खुद्द वस्तूतही असतात.ती खरी असतात, वस्तू नाही.

मात्र सामान्यें सत्य आहेत म्हणजे त्यांना वास्तव जगांत अस्तित्व आहे काय ? या प्रश्नांसंबंधी निरनिराळया बुध्दिवादी लोकांचीं निरनिराळीं मतें आहेत.

शांपोचा विल्यम पराकोटीचा वास्तववादी होता.त्याच्या विरोधी अशी मधली भूमिका ॲबेलार्ड याने घेतली होती.ॲबेलार्ड परंपरेने संकल्पनावादाचा [Conceptualism] प्रणेता मानला जातो.त्याची खरी शिकवण कोणत्या प्रकारची होती यांविषयी जरी शंका असली तरी त्याच्या विचारामध्ये संकल्पनावादाचे अंश होते हे नि:संशय.

## संकल्पनावादाचे स्वरूप

ॲबेलार्डने 'सामान्यांच्या स्वरूपाविषयीच्या वादात त्याने जहाल वास्तववादी आणि नामवादी यांचा समन्वय साधणारी सुवर्णमध्याची भूमिका तयार केली. जहाल वास्तववाद्यांच्या मते 'आपल्या सामान्यांच्या संकल्पनांना अनुसरून ' सामान्ये' अस्तित्वात असतात तर नामवाद्यांच्या मते केवळ विशिष्ट वस्तु अस्तित्वात असतात. सामान्ये' ही केवळ नामे आहेत.ॲबेलार्डच्या मते वस्तूंमध्येच असे काहीतरी असते की ज्यामुळे त्यासंबंधी 'सामान्य ' संकल्पना मान्य करणे युक्त ठरते.

सध्या अमूर्त कल्पनांविषयी [Abstract ideas] जे मत सर्वसाधारणपणे मान्य झालेले आहे ते व संकलपनावाद हे एकच होत असे म्हणावयास हरकत नाही. खरे म्हणजे भाषेत वापरण्यात येणाऱ्या वर्गदर्शक पदांना [Class Terms] स्वत:चे स्वतंत्र व वास्तव अस्तित्व नसते. ही पदे आपल्या मनात फक्त विचार किंवा

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

संकल्पनांच्या स्वरुपात वसत असतात.म्हणजे 'सामान्ये ' म्हणतो त्यांना विरोध नाहीच, उलट सामान्ये ही ज्ञान म्हणून अनिवार्य आकार किंवा साचे असतातच.म्हणून आपणास ज्या वस्तूंचे ज्ञान होते त्यांच्या स्वरुपात त्या वस्तूंच्या *सामान्यांना* काहीतरी अस्तित्व असतेच, असे ॲबेलाड मानतो.सामान्ये म्हणजे म्हणजे समान प्रकारच्या किंवा समान गूणधर्माच्या अनेक वस्तूंमध्ये किंवा घटनांमध्ये सारगुणांची साम्ये होय.

वस्तूंमधील हे जे साम्य असते ते संख्येने एकपण [Identity] नसते, तर विशिष्ठ वस्तूंचे आपणास होणारे ज्ञान ज्या ऐक्यामुळे शक्य होते असे ऐक्य म्हणजे हे सामान्य असते.ही सामान्ये ईश्वराने निर्मिलेले प्रकार असतात असे त्याचे म्हणणे आहे. म्हणून सामान्यांना स्वत:चे वेगळे, स्वतंत्र, वास्तव असे ज्ञात्या मनाच्या बाहेर,मननिरपेक्ष असे अस्तित्व नसते,असे ॲबेलार्ड मानतो.

पण त्याचबरोबर ती सामान्ये केवळ श्वास किंवा ज्यांचा प्रत्यक्ष वस्तूशी कोणत्याही प्रकारचा संबंध नाही असे केवळ शब्दही नाहीत, पण ते विधेय असते व ज्यात संवेदनांच्या आशयाची तुलना केलेली असते अशी ती सामान्ये, संकल्पना असतात.मन या साम्याचे अमूर्तीकरण करते तेव्हा तिला वस्तुनिष्ठ युक्तता किंवा वास्तविक सत्यता लाभते. ॲबेलार्डच्या मते जेव्हा आपला विचार सर्ववाची बनतो किंवा सामान्य पदांच्या साहाय्याने वस्तूंचे आकलन करतो तेव्हा तो निव्वळ शब्दाच्या पलीकडे जात असतो.विधेयनाच्या मार्गाने शब्द अंतिम सत्तेला जाऊन भिडतो.

प्रजाती [General] व जाती [Species] यांच्यात भेद असतो. ते प्रत्यक्ष त्या वस्तूमध्येच असतात. त्या वस्तूंचे किंवा घटनांचे गुणधर्म आपण व्यक्त करतो तेव्हा आपल्या मनातील संकलपना त्यांच्यामधील साम्ये व भेद स्पष्टपणे व्यक्त करीत असतात. सामान्ये ही तीन प्रकारची अस्तित्वात असतात, असे ॲबेलार्डचे मत आहे :

[1] सामान्ये वस्तूंच्या आधी आयडियांच्या [Ideas] स्वरुपात ईश्वराच्या मनात वसतात.
[2] वस्तूंच्या साररुपी साम्यांच्या रुपाने ती वस्तूंच्या बरोबरच अस्तित्वात असतात.
[3]मानवाच्या मनाला वस्तूंचे ज्ञान झालयानंतर ती अस्तित्वात येतात.

ॲबेलार्डने सामान्यांच्या अस्तित्वाचा पध्दतशीरपणे विचार व विकास केला नाही. त्याला जे वाटले ते त्याने सरळ मांडले. त्याच्या दृष्टीने ईश्वराच्या मनात [Anterem] निसर्गात [Inre] व मानवाच्या ज्ञानात [Postrem] सामान्यांना सारखेच महत्व असते.म्हणजे वस्तूंच्या गुणधर्मामध्ये असणारा सारखेपणा हा मुळात ईश्वराच्या मनातील एक कल्पना असते.मानवाचे मन या सारखेपणात जे सामान्यत्व असते ते व्यक्त करण्यासाठी, त्यासाठी उपयुक्त शब्द वर्गपद तयार करण्याकरिता त्या गुणधर्माचे अमूर्तीकरण करीत असते.हा *ॲबेलॉर्डचा संकल्पनावाद* होय.

सामान्ये विशिष्ट वस्तू व घटना यांच्यापासून दूर व अलिप्त राहू शकत नाहीत. ती प्रत्यक्ष वस्तूमध्ये असतात व त्यांचे ज्ञान मानवी मनाला समान गुणधर्माच्या रुपाने होते.त्यांच्यामार्फत अनेक सारख्या वस्तू त्यांच्या वर्गात बसविल्या जाऊन त्यांचे ज्ञान सुगम होते. हे ॲबेलार्डला दाखववायाचे होते.

Department of Philosophy, Sangamner College Sangamner

## बुध्दिनिष्ठ समर्थन

ॲबेलार्ड बुध्दिवादी रीतीने विचार करणारा असल्याने त्याच्या विचारात सुस्पष्टता आहे.चर्चच्या सिध्दान्तांनाही तो आपला बुध्दिवाद लागू करतो. बुध्दिनिष्ठ समर्थनाशिवाय जे लोक केवळ भरंवशावर धार्मिक श्रध्दांचा स्वीकार करतात त्यांच्यावर तो मोकळेपणाने सरळ टीका करतो. तो म्हणतो *"ईश्वराने सांगितले आहे म्हणून एखाद्या सिध्दान्तावर विश्वास ठेवायचा नसतो, पण आपल्या बुध्दीला त्याच्या सत्यतेची खात्री पटलेली असावयास पाहिजे."* त्याच्या मते चर्चला वाटते त्याप्रमाणे एखाद्या गोष्टीविषयी संशय येणे हे काही पाप नसते उलट संशय आल्याने मनुष्य काळजीपूर्वक चिकित्सक विचार करु लागतो.त्यामुळे सत्य स्पष्टपणे कळावयास मदतच होते.

तत्वज्ञ लोकांनी डोळसपणे, बुध्दिनिष्ठतेने व चिकित्सकपणे नैतिक व धार्मिक सत्यांचे केलेले अन्वेषण त्याला योग्यच वाटते. धर्माचे श्रध्देला डोळस बुध्दिनिष्ट विचारांचा आधार असावा असे त्याचे प्रामाणिक मत आहे. खरे पाहता अॅबेलार्ड हा मुक्त व बुध्दिनिष्ठ विचारांचा पुरस्कर्ता आहे. धर्माच्या श्रध्दासुध्दा बुध्दीने तपासून घेऊन व त्यांची युक्तता बुध्दीने सिध्द केल्यावरच तो स्वीकारावयास तयार होतो. तो आंधळेपणाने चर्चचा प्राधिकार मान्य करावयास तयार होत नाही.

अॅबेलार्ड हा बुध्दीवादी असलयाने त्याने विमर्शक बुध्दीस धार्मिक श्रध्देपेक्षा उच्च व श्रेष्ठ स्थान देऊन व धर्मतत्वांनी बुध्दिनिष्ठतेस अनुकुलता दाखविली.पण त्याला प्लेटो व अॅरिस्टॉटल यांच्या विचारांचे व तत्वज्ञानाचे पुरेसे ज्ञान नव्हते. निरीक्षण व अनुभवावर आधारलेली पुरेशी वैज्ञानिक सामग्रीही त्याच्याकडे उपलब्ध नव्हती.



अॅबेलॉर्डने नीतिशास्त्रास स्वतंत्र स्थान व दर्जा दिला.प्रत्यक्ष कृती बरोबर किंवा चूक असण्यापेक्षा ती करण्यामागे कर्त्याचा जो हेतू असतो त्याला नैतिक महत्व असावयास पाहिजे,असे तो म्हणतो.माणसाची सदसद्विवेकबुध्दी ही सर्व मानवांमध्ये सामाईक असल्याने तिला निसर्गनियमाचा दर्जा व महत्व असते.व्यक्तीने आपल्या सदसद्विवेकबुध्दीस प्रामाणिक राहून नीतीच्या बाबतीत तिचे आदेश पाळावे व मार्गदर्शन घ्यावे असे त्याचे म्हणणे आहे.

त्याचबरोबर तो ईश्वरनिष्ठ असलयामुळे ईश्वरी इच्छा ही नीतिनियमास पायाभूत असते असे तो मानतो त्याचा अर्थ असा की व्यक्तीने सदसद्विवेक बुध्दीच्या आदेशांचे आचरण करणे म्हणजेच ईश्वराचे आज्ञापालन ठरते.पण ईश्वराची इच्छा नेमकी काय आहे ते समजण्यात माणसाची चूक होते, आपले ज्ञान तोकडे पडते व म्हणून शेवटी ईश्वराची इच्छा त्याच्यावरील श्रध्देनेच समजावी लागते.माणसाने योग्य व अयोग्य काय ते ठरवावयाचे नसून ईश्वराची इच्छा नेमकी काय आहे ती जाणून घ्यावयाची असते. ईश्वराने जे जे काही निर्मिले आहे ते चांगले आहे.ते त्याच्या स्वभावाचे अनिवार्य व्यक्तीकरणच आहे. मानवाने ईश्वरी इच्छा कोणती आहे ही नीट समजून घेऊन, तिला अनुलक्षून वागणे म्हणजेच सक्तीपासून मुक्त होणे किंवा स्वातंत्र्य अनूभवणे होय.म्हणून पाप हे केवळ दुष्टबुध्दीच नसते तर ते म्हणजे ईश्वराचा प्रत्यक्ष तिरस्कार व अपमानच ठरते असे अॅबेलार्डचे मत आहे.

-----------------------------------------------

## विल्यम ऑफ ओखॅम

विल्यम ऑफ ओखॅम (William of Ockham: 1280 – 1349) हा प्राधान्याने ***ओखॅम*** याच नावाने ओळखला जातो. त्याचा जन्म इंग्लंडमध्ये ओखॅम येथे 1280 मध्ये झाला व त्याचे शिक्षण ऑक्सफर्ड येथे झाले. ऑक्सफर्ड येथे शिकत असताना बहुतेक तो डन्स स्कॉटसचा विद्यार्थी असावा असे समजले जाते. तो फ्रान्सिस्कन पंथीय होता. त्याने 1320 ते 1325 पर्यंत पॅरिस येथे अध्यापनाचे कार्य केले.नंतर त्याने पॅरिस सोडले व तो त्या वेळच्या पोपच्या विरुध्द असलेल्या पक्षाला जाऊन मिळाला. त्या वेळी चर्च व राज्यसंख्या यांच्यात कडाक्याचा वाद सुरु होता. त्या वेळी त्याने राष्ट्रवाद्यांची बाजू घेतली. त्याला बव्हेरियाच्या लुईचे संरक्षण मिळाले. अॅव्हिनॉन येथे त्याला तुरुगात डांबण्यात आले होते पण तो तेथून निसटला व त्याने बव्हेरियाच्या लुईच्या दरबाराचा आश्रय घेतला.त्याने लुईला दिलेले विख्यात वचन म्हणजे ***'' तू जर तुझ्या तलवारीने माझे संरक्षण केले तर मी माझ्या लेखणीने तुझे संरक्षण करीन ''*** बव्हेरियाच्या राजाच्या आश्रयाला असतानाच 1349 च्या सुमारास त्याचे निधन झाले.

ओखॅमला *त्याच्या युगाचा अॅबेलार्ड* म्हणत असत. त्याच्याजवळ अस्तित्वाचे व्यापक व सूक्ष्म दर्शन करण्याची दृष्टी होता.नवसर्जन करण्यासाठी लागणारी बेडर वृत्ती व अविश्रांत श्रम करण्यासाठी लागणारा उत्साह ओतप्रोत होता,असे विंडलबॅंड या तत्त्वज्ञानाच्या इतिहासकारचे मत आहे.ओखॅमचे अनुयायी त्याला

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*आदरणीय प्रणेता (Venerable Inceptor)* किंवा *अजिंक्य डॉक्टर (Invincible Doctor)* अशा शब्दांनी गौरवीत असत. त्याला *प्रारंभिक प्रोटेस्टंट* असेही म्हणतात.

**William of Ockham**
( 1288 – c. 1348)
an English Franciscan friar and scholastic philosopher.
he is commonly known for Occam's razor






ओखॅमचे महत्वाचे ग्रंथ Sentences, Summa totius, logices,Quodlibeta Septem; Centloquim theolgicum हे आहेत. राज्यसंस्था व चर्च यावरही त्याने लेखन केलेले आहे.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

## पदवाद (टर्मिनिझम Terminism)

विज्ञान हे पूर्णपणे अशा प्रतीकांशी किंवा पदांशी [Terms-Termini] संबंधित असते. येथे पद याचा अर्थ शब्द व त्याचा अर्थ असा आहे. ओखॅमच्या मते सामान्ये ही केवळ नावे किंवा नामे नसून ती संकल्पना प्रतीके किंवा टर्मिनी [Termini] असतात.ती प्रत्यक्ष अस्तित्वात असणा-या विशिष्ट वस्तूंसाठी वापरली जातात. म्हणून ओखॅमच्या सिध्दांन्ताला पदवाद *[टर्मिनिझम Terminism]* म्हणतात.

त्याच्या या सिध्दान्तानुसार इंद्रियज्ञान हे वस्तूची केवळ प्रतिकृती [Copy] नसते. प्रत्येक कल्पना ही आत्म्याची एक अवस्था असते आणि ती अनेक संवेदने व्यक्त करीत असते.त्यांना समानुरुप पध्दतीने आंतरजाणिवेच्या अवस्थांची श्रेणी असते व त्यांना अनुलक्षून कल्पना बनतात. म्हणून जर सत्य काही असेल तर फक्त विशिष्ट वस्तूच असतात.

ओखॅमच्या मतानुसार फक्त विशिष्टच (वस्तू किंवा व्यक्ती) अस्तित्वात असतात. त्यांच्यापासूनच आपल्या ज्ञानास प्रारंभ होतो. म्हणजे ज्ञानास संवेदनापासून सुरुवात होते आणि होणारे ज्ञान आपण आवधारणाच्या रुपाने व्यक्त करीत असतो. अनेक समान विशिष्ट वस्तूंमध्ये जे साधारण गुणधर्म असतात,त्यांचे आपण बौध्दिक वियोजन करतो आणि सामान्य संकल्पना तयार करीत असतो.यासाठी आपणांजवळ मनाची किंवा बुध्दीची खास मन:शक्ती [Faculty] वगैरे नसते. आपणासमोर दोन सारख्या वस्तू येतात तेव्हा आपण स्वाभाविकपणे त्यांच्या साधारण गुणांचे बौध्दिक अमूर्तीकरण सहज करीत असतो. अशी जी सामान्ये मनाने किंवा बुध्दीने आपण तयार करतो ती मनामध्ये केवळ कल्पनांच्या किंवा विचारांच्या रुपाने अस्तित्वात असतात.ती शब्दांच्या किंवा काही सांकेतिक प्रतीकांच्या मार्फत त्यांना आपण व्यक्त करीत असतो.

ओखॅमच्या मते ईश्वराला सुध्दा विशिष्ट वस्तूंचेच ज्ञान होत असते, सामान्य स्वरुपाच्या वस्तूंचे नव्हे. सामान्ये ही वस्तूंच्या रुपाने मानवाच्या मनात नसतात, तशी ती ईश्वराच्याही मनात द्रव्य किंवा वस्तूच्या रुपाने वसत नसतात. ईश्वराच्या दृष्टीने सुध्दा फक्त विशिष्ट व विवक्षित वस्तूंनाच खरे अस्तित्व असते. म्हणून वास्तववाद ज्याची कल्पना करतो ते सामान्य त्याच्या दृष्टीने अतिरिक्त व अनावश्यक असते. ओखॅमच्या मतानुसार सामान्ये

मानसेतर [Immanent] मनाबाहेरची नसतात. वास्ववाद सामान्यांना मानसेतर [Extramental] अस्तित्व असल्याचे समजतो, तेच चूकीचे आहे. त्यामूळे आपण अमूर्त गोष्टीना मूर्त व भौतिक अस्तित्व असते असे समजतो, मग कल्पनाना मूर्त व वास्तव रुप देतो.त्यानंतर सर्व प्रकारच्या अशक्यप्राय व हास्यापद जंजाळात स्वत:ला अडकवून घेतो.

## अंतर्ज्ञान



ओखॅमच्या मते अंतर्ज्ञान व्यापक असते. त्यात इंद्रियसंवेदन तर येतेच, पण बुध्दियुक्त विचार करणे, संकल्पशक्तीच्या किया, आनंद, दु:ख यांचाही अंतर्ज्ञानात समावेश होत असतो अर्थात या रीतीने आपणास आत्म्याच्या स्वरुपाचे ज्ञान होत नाही हे खरे, पण आत्म्याच्या कार्य करण्याच्या पध्दतीचे ज्ञान आपणांस अंतर्ज्ञानाने होत असते. अशा प्रत्यक्ष ज्ञानाव्यतिरिक्त अमूर्त स्वरुपाचे ज्ञान याचाही अंतर्भाव होतो.

## लाघव नियम : *OCKHAM'S ROZOR*

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

ओखॅम हा आद्य प्रोटेस्टंट (First protestant) समजला जातो. तो व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कर्ता असल्याने तो प्रोटॅगोरासची आठवण करुन देतो.कल्पना या वास्तव वस्तूंचे संक्षिप्त सारांश असतात. निरुपयोगी, संदिग्ध व भाराभर संकल्पनांचा त्याग करुन अगदी थोडक्यात आपणांस ज्ञानाचा संक्षेप करता आला पाहिजे, हा ओखॅमचा नियम होता.त्यास तो ***लाघव नियम*** (*lex parsimoniae: Law ot Parsimony, Ockham's Rozor,* law of economy or law of succinctness) म्हणतो. ''जरूरीपेक्षा अधिक संख्येने तत्त्वांची संख्या वाढवू नये '' ("entities must not be multiplied beyond necessity" )हे त्याचे काटकसर तत्त्व होते.यालाच *ओखॅमचा वस्तरा* म्हणतात.[12] सध्याच्या फलवादी दृष्टिकोनासारखाच हा विचार आहे.

ओखॅमची प्रवृत्ती साधेपणा आणण्यासाठी झुकलेली होती.म्हणून तो सर्व प्रकारची तात्विक व मानसशास्त्रीय जाळी, जळमटे, कोळीष्टके किंवा जंजाळे निष्ठुरपणे कापून छाटून टाकून ज्ञानाची प्रकिया स्वच्छ, सरळ व स्पष्ट करण्याविषयी विशेष दक्ष होता.

त्याची साधेकरणाची कल्पना फारच महत्वाची आहे. नवजीवनाचे जे ख्रिश्चनधर्मविरोधी होऊन गेले त्यांचा ओखॅम पूर्वगामी समजला जातो. ओखॅमने स्कोलॅस्टिकवादाची मूलतत्वे तोडून काढली व नामवादाला जोराने चालना दिली.सर्व प्रस्थापित अधिका-यांना आहवान देण्याचा हक्क खंबीरपणे प्रस्थापित केला. ओखॅमच्या पुस्तकांचा वापर करण्यावर पॅरिस विद्यापीठात 1339 मध्ये बंदी घालण्यात आली होती, व 1340 मध्ये नामवाद अमान्य करण्यात आला होता. पोपने नामवादाच्या सिध्दान्ताची निर्मर्त्सना केली व जे चर्चचे संगोपन करणारे होते त्याच्यावर वास्तववादाचा अंगीकार करणे हे बंधनकारक ठरविले.

कॉपल्स्टन या इतिकाराच्या मते ओखॅमच्या व्यक्तिमत्वाची दोन अंगे होती.एकीकडे ओखॅम हा विकाररहित व संथपणे तर्कशुध्द रीतीने विचार करणारा व सैद्वान्तिक तत्ववेत्ता म्हणून दिसतो, तर दुसरीकडे राजकीय व व्यावहारिक जीवनात हिरिरीने विवाद्य मुद्यात तो एकांगी व अतिरेकी भूमिका घेऊन त्यांचे जोरदारपणे समर्थनही करतो. व्यक्तिमत्वाच्या त्याच्या या दोन अंगात विसंवाद नाही, असे कॉपल्स्टनचे मत आहे.

ओखॅम हा निर्भय, धीट, आणि चैतन्याने रसरसणारा स्वतंत्र प्रज्ञेचा विचारवंत होता. त्याची चिकित्सकपणे विचार करण्याची कुवत वाखावण्यासारखी हाती.ओखॅमजवळ कुशाग्र तर्कनिष्ठता होती व स्वतंत्रपणे, निर्भयपणे व

[12] त्याचे हे लाघवाचे तत्व त्याच्या आधी पीटर ऑरेली याने मांडले होते असे समजले जाते.

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

बंडखोरपणे विचार करण्याची जिदद होती. म्हणून प्रस्थापित अधिका-यांच्या दडपणाला न भिता त्याने त्यांना आव्हान दिले.ओखॅमच्या विचारात अनुभवनिष्ठता, बुध्दिनिष्ठता, तर्कनिष्ठता, व ईश्वरनिष्ठता या सर्व प्रवृत्ती मिसळून गेलेल्या दिसतात.पण या सर्वाचा समन्वय योग्यपणे त्याच्या विचारात कितपत झाला होता, हे ठरविणे कठीण आहे.

तथापि एक तत्वज्ञ म्हणून त्याचे प्रमुख लक्ष्य ख्रिश्चन ईश्वरशास्त्र व तत्वज्ञान यांची ग्रीक अनिवार्यतावादापासून (Necessitarianism) मुक्ती करुन मुख्यत: सार उत्पत्ती पूर्णपणे खोडून काढून त्यांना शुध्द करणे हे होते. कारण त्याच्या मते सारसिध्दान्तामुळे ईश्वराचे स्वातंत्र्य व सर्वशक्तिसंपन्नच यांच्या ख्रिश्चन सिध्दान्ताला मोठाच धक्का पोहोचत होता.म्हणूनच त्याने सामान्यांच्या वास्तववादी सिध्दान्तावर कडाडून हल्ला चढविला.तो फरॅन्सिस्कन ईश्वर शास्त्रज्ञ होता.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner